पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ४ थी ऐवजी ५ वी व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ७ ऐवजी ८ वी मध्ये आयोजित करणे आणि "पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती योजने"चे नामाभिधान "उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती योजना " असे करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एफईडी-४०१४/६४३/प्र.क्र.४/एसडी-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २९ जून, २०१५.

वाचा:-

१) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-एससीएच-२००९/(९०/०९)केंपुयो, दि.२२ जुलै, २०१०.

२) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे पत्र क्रमांक :मरापप/शिष्यवृत्ती/ २०१५/ १२१९, दिनांक ६.फेब्रुवारी,२०१५.

प्रस्तावना:-

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्याची योजना सन १९५४-५५ पासून कार्यान्वित आहे. सध्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचेमार्फत ही परीक्षा दरवर्षी घेण्यात येते. ही परीक्षा कनिष्ठ प्राथमिक स्तरावर शेवटच्या इयत्तेत म्हणजे इयत्ता ४ थी मध्ये घेण्यात येते तर वरिष्ठ प्राथमिक स्तरावर शेवटच्या इयत्तेत म्हणजे इयत्ता ७ वी मध्ये घेण्यात येते.

केंद्र शासनाने बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ पारित केला असून राज्यात या कायद्याची अंमलबजावणी दि.१ एप्रिल,२०१० पासून सुरु झालेली आहे. या कायद्यान्वये इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण प्राथमिक शिक्षण म्हणून विहित केलेले आहे.या कायद्यातील तरतूदी विचारात घेवून राज्यात कार्यान्वित असलेली पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर इयत्ता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी आणि इयत्ता ७वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये करणे आणि सदर योजनेचे नामाभिधान "प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळा शिष्यवृत्ती योजना" असे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

यापुढे पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परिक्षेचा स्तर इयत्ता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी आणि इयत्ता ७वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेत असताना ज्या विद्यार्थ्यांची मार्च,२०१५ मध्ये शिष्यवृत्ती परीक्षा झालेली आहे असे विद्यार्थी सन २०१५-१६ या वर्षात अनुक्रमे इयत्ता ५ वी व ८ वी इयत्तेत असणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांची एकदा परीक्षा झालेली असल्याने सन २०१५-१६ मध्ये या परीक्षेचे आयोजन करण्यात येणार नाही. सबब, या शिष्यवृत्ती परिक्षेचे आयोजन सन २०१६-१७ पासून इयत्ता ५ वी व ८ वी मध्ये नियमितपणे करण्यात यावे.

३. त्याचप्रमाणे यापुढे "पूर्व माध्यमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती योजनेचे" **नामाभिधान "उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती योजना"** असे करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. प्रस्तुत बदलांमुळे अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये होणा-या बदलांबाबत आवश्यक ती कार्यवाही शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६२९१५३९५१०७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2015.06.29 15:43:09 +05'30'

( रा. ग. गुंजाळ )
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुंबई.
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मुंबई.
४. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)

५. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
६. मा.सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधान भवन, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
८. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
९. सर्व प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व महानगरपालिका आयुक्त.
११. मा.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
१४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य ,पुणे
१५. शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य , पुणे
१६. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१७. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक ), जिल्हा परिषद
१८. शिक्षण निरीक्षक ( दक्षिण / उत्तर / पश्चिम ), मुंबई.
१९. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
२०. निवडनस्ती (कार्यासन एसडी-५)